नगर रचनाकार यांच्या अधिपत्याखालील राज्यातील १२ जिल्हा शाखा कार्यालये सहायक संचालक, नगर रचना यांच्या अधिपत्याखाली दर्जोन्नत करण्यासाठी व नविन पदनिर्मितीस मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.पदनि-६४१६/१०८२/प्र.क्र.२४०/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०२ मे ,२०१९.

पहा :- १) नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र.टिपीव्ही-०२००३/८६६/प्र.क्र.१२४/०३/नवि-२७, दिनांक ०१ मार्च,२००६.
२) उच्चस्तरीय सचिव समितीचे कार्यवृत्त क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.०९/१९/आपुक, दिनांक २०.०२.२०१९.

प्रस्तावना :-

नगर विकास विभागाच्या अधिपत्याखालील नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभागातील आस्थापनेवर दिनांक ०१.०३.२००६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर आकृतीबंधानुसार विविध संवर्गातील ११७६ पदे कार्यरत आहेत. नगर रचनाकार यांच्या अधिपत्याखालील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, धुळे,भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली,वर्धा,बीड,जालना,लातूर,उस्मानाबाद आणि बुलढाणा या १२ जिल्हयातील १२ शाखा कार्यालये सहायक संचालक,नगर रचना यांच्या अधिपत्याखाली दर्जोन्नत करण्यासाठी व त्याकरीता विविध संवर्गातील ६० नियमित पदे व १८ काल्पनिक पदांची पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाकडील उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीने त्यांच्या दिनांक ०८ फेब्रुवारी,२०१९ रोजी झालेल्या बैठकीच्या दिनांक २०.०२.२०१९ रोजीच्या कार्यवृत्तान्वये नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाच्या आस्थापनेवरील पूर्वी मंजूर असलेल्या विविध संवर्गातील ११७६ पदांव्यतिरिक्त विविध संवर्गातील खालील नवीन ७८ पदे निर्माण करण्यास मंजूरी प्रदान केली आहे.आता याबाबत पुढीलप्रमाणे शासन आदेश देण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

वित्त विभागाकडील उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ०८ फेब्रुवारी,२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार नगर विकास विभागाच्या अधिपत्याखालील नगर रचना व मूल्यनिर्धारण विभागाच्या आस्थापनेवर नगर रचनाकार कार्यालय प्रमुख असलेली सिंधुदुर्ग, रत्नागिरी, धुळे,भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली,वर्धा,बीड,जालना,लातूर,उस्मानाबाद आणि बुलढाणा या १२ जिल्हयातील १२ शाखा कार्यालये दर्जोन्नत करण्यास तसेच संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध संवर्गातील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आल्यानुसार ६० नियमित पदे व १८ काल्पनिक पदे निर्माण करण्यास याद्वारे मंजूरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	संवर्ग	वेतनश्रेणी ६ वा वेतन आयोग		वेतनश्रेणी	पदसंख्या
		पे बँड	ग्रेड वेतन	७ वा वेतन आयोग	
नियमित पदे					
१	सहायक संचालक,नगर रचना	रु.१५६००-३९१००	६६००/-	एस-२३ रु.६७७००-२०८७००	१२
२	सहायक नगर रचनाकार	रु.९३००-३४८००	४४००/-	एस-१५ रु.४१८००-१३२३००	११
३	रचना सहायक	रु.९३००-३४८००	४३००/-	एस-१४ रु.३८६००-१२२८००	१
४	निम्नश्रेणी लघुलेखक	रु.९३००-३४८००	४३००/-	एस-१४ रु.३८६००-१२२८००	१२
५	सहायक आरेखक	रु.५२००-२०२००	२८००/-	एस-१० रु.२९२००-९२३००	११
		०४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर- रु.९३००-३४८००	४३००/-	०४ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१४ रु.३८६००-१२२८००	
६	कनिष्ठ आरेखक	रु.५२००-२०२००	२४००/-	एस-८ रु.२५५००-८११००	८
		०५ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर- रु.९३००-३४८००	४२००/-	०५ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-१० रु.३५४००-११२४००	
७	अनुरेखक	रु.५२००-२०२००	२०००/-	एस-७ रु.२१७००-६९१००	१
		०७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर- रु.५२००-२०२००	२४००/-	०७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर एस-८ रु.२५५००-८११००	
८	कनिष्ठ लिपिक	रु.५२००-२०२००	१९००/-	एस-६ रु.१९९००-६३२००	४
(अ) एकूण नियमित पदे :-					६०
काल्पनिक पदे (बाह्यस्त्रोताद्वारे)					
९	वाहनचालक				११
१०	शिपाई				७
(ब) एकूण काल्पनिक पदे:-					१८
एकूण (अ)+(ब) :-					७८

०२. उपरोक्त नमूद केलेल्या नवनिर्मित पदांना त्या त्या पदांसाठी शासनाने विहित केलेल्या विविध संवर्गाच्या सेवाशर्ती व अटी लागू राहतील.

०३. ज्या संवर्गातील कामे बाहयस्त्रोत्राद्वारे करुन घेण्यास मान्यता दिली आहे, त्या पदांची कामे बाह्यस्त्रोताद्वारे करुन घेताना शासन परिपत्रक,वित्त विभाग, दिनांक २७.०९.२०१०, दिनांक ०२.०२.२०१३, दिनांक ०२.१२.२०१३ व दिनांक ०२.०८.२०१६ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करुन विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करावी.

०५. सदरहू पदांचे वेतन व भत्ते मागणी क्र.एफ-२,मुख्य लेखाशिर्ष-२२१७, (००)(०३) संचालक, नगर रचना यांची शाखा कार्यालये (दत्तमत)(अनिवार्य) सं. क्र.२२१७०१३६,या लेखाशिर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

०६. सदर शासन निर्णय उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक २०.०२.२०१९ च्या कार्यवृत्तास व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. १४२/आपुक/ दिनांक ११/०३/२०१९ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेताक क्र. २०१९०५०२१०४६२७७३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2019.05.16 11:33:55 +05'30'

(विष्णू पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३. महालेखापाल (लेखा परिक्षा)-१,महाराष्ट्र,मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परिक्षा)-२,महाराष्ट्र,नागपूर.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
६. मा.मुख्यमंत्र्याचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई.
७. मा.अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
८. मा.अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
९. मा.अपर मुख्य सचिव,(प्र.सु व र.व का.),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई.
१०. मा.प्रधान सचिव (ले व को),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
११. मा.सचिव (व्यय),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
१२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई/नागपूर.
१३. सर्व विभागीय आयुक्त ,कोकण नवी मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
१४. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण विभाग,महाराष्ट्र राज्य,पुणे.
१५. सह संचालक, लेखा व कोषागरे, नविन प्रशासन भवन,मंत्रालय,मुंबई.

१६. सर्व सह संचालक, नगर रचना, कोकण नवी मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
१७. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१८. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, धुळे,भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली,वर्धा,बीड, जालना,लातूर,उस्मानाबाद , बुलढाणा
१९. जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, धुळे,भंडारा,चंद्रपूर,गडचिरोली,वर्धा,बीड, जालना,लातूर,उस्मानाबाद , बुलढाणा
२०. मा.राज्यमंत्री,(नगर विकास) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
२१. मा.प्रधान सचिव (नवि-१) व मा.प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
२२. अवर सचिव (नवि-३,नवि-४,नवि-२९),नगर विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
२३. कक्ष अधिकारी, (आकृतीबंध पुनर्रचना कक्ष),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई.
२४. निवडनस्ती/नवि-२७.